# चित्‌शक्ती विलास

## स्वामी मुक्तानंद

चित्त, जसे चिंतन असेल तसे फळ देणारे आहे. मानव चित्तामुळेच शांत, चित्तामुळे भ्रांत, चित्तामुळे मेधावी, चित्तप्रसादाने कवी, चित्तामुळेच बुद्धिमान, चित्तामुळे उच्च कलाकार, चित्तामुळे महान संगीतकार आणि चित्तामुळे योगी होतो. चित्तामुळेच शास्त्रांमध्ये उपाधी आणि चित्तामुळेच समाधी प्राप्त होते. चित्तच गुरू, चित्त शक्तिसंचालक आणि चित्तच निर्विकल्प पद आहे. चित्तभ्रष्ट सदा कष्टी, कर्माचार-भ्रष्टी आणि मोक्षमार्ग-नष्टी असतो. मलिन चित्त हाच घोर नरक आहे.

चित्ताला सांभाळा. चित्त हा तुमचा सुखद मित्र आहे. गुरुजनांच्या परम प्रेमाचे अधिकारी शुद्ध चित्त आहे. यासाठी तुम्ही शांत चित्ताने ध्यान करा. चित्तात राहणारा परमेश्वर, त्वरित प्रसन्न होऊन तुम्हाला ध्यानात आपले पूर्ण विश्वरूप दाखवेल. या चित्तप्रसादाने तुम्ही आत्म-विमर्श सहज प्राप्त कराल.

तुमच्यापाशी चित्तरूपी केवढी मोठी संपत्ती आहे! इतकी महान आश्चर्यमय चितिशक्ती तुमच्यापाशी असताना तुम्ही आरडाओरडा का करता? दुःखी-कष्टी का होता? हीन-दीन का बनता? चित्तात सतत वास करणाऱ्या चितिशक्तीची पूजा करा. चित्तामध्ये अंतःस्फुरणरूपाने स्फुरणाऱ्या आत्मतत्त्वाचे सदैव स्मरण करीत व्यवहार करा.

© २०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

स्वामी मुक्तानंद, *चित्‌शक्ती विलास* [चित्‌शक्ती पब्लिकेशन्स, २०१३] पृष्ठ ४९.